# महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित
# ग्राहक तक्रार निवारण मंच
# कोल्हापूर परिमंडळ, कोल्हापूर

MAHADISCOM
Maharashtra State Electricity Distribution Co. Ltd.

सं.क्र.काअ/ग्रातनिमं/कोप/५४/२०१४-१५/२०७ दिनांक : १६.१०.२०१४

## आदेश केस क्र. ५४/१४-१५

१) श्री.राजाराम बाजी बंडगर,
मु.पो. बागेवाडी, ता. जत,
जिल्हा - सांगली

- अर्जदार

**विरुध्द**

१) कार्यकारी अभियंता (का) तथा नोडल ऑफीसर,
महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित,
मंडल कार्यालय, सांगली.

२) कार्यकारी अभियंता, - पक्षकार
महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित,
विभागीय कार्यालय, कवठे महांकाळ

३) उपकार्यकारी अभियंता,
महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित,
उपविभागीय कार्यालय, जत.

**कोरमः-** १. श्री.बी.जी.पवार,अध्यक्ष
२. श्री.जी.बी.पानकर, सदस्य सचिव
३. श्री.जी.सी.लेले,सदस्य

**महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग**
**(ग्राहक तक्रार निवारण मंच व विद्युत लोकपाल)**
**विनियम २००६ मधील ८.२ चे तरतुदीनुसार**

## न्याय निर्णय

श्री.बी.जी.पवार, अध्यक्ष, ग्रा.त.नि.मंच. कोल्हापूर, खालीलप्रमाणे न्याय निर्णय देत आहेत.

श्री. राजाराम बाजी बंडगर, मु.पो. बागेवाडी, ता. जत, जि. सांगली यांनी वितरण कंपनी विभागीय कार्यालय, कवठे महांकाळ, जत उप विभागीय कार्यालयाविरुध्द मंचाकडे दि. २६.०८.२०१४ रोजी गाऱ्हाणे दाखल केले. ग्राहकाने बागेवाडी ता. जत येथील आपले घर क्र. ३४९ येथे घरगुती वीज पुरवठ्यासाठी चलन रु. १०२५/- दि. ०८.०३.२०१२ रोजी भरले आहे. वितरण कंपनीने डांब टाकून वीज जोडणी देणार आहोत परंतु सध्या केबलवर वीज घ्यावी व नंतर सुरक्षित विद्युत वाहिनी उभी करुन देऊ असे सांगितलेने ग्राहकाने तात्पुरता केबलवर वीज पुरवठा घेतला आहे. मात्र २ वर्षाचा कालावधी लोटूनही ग्राहकास सुरक्षित वीज जोडणी मिळालेली नाही. ग्राहकाने दि. १२.०५.२०१४ रोजी अंतर्गत तक्रार निवारण कक्ष, सांगली येथे तक्रार दाखल केली. अंतर्गत कक्षाचे दि. २६.०६.२०१४ रोजी आदेश झाले. त्यामध्ये कृती मानके विनियम २००५ नुसार पायाभूत सुविधा व विद्युत वाहिनी उभी करुन जेष्ठता क्रमांकानुसार वीज जोडणी देण्यात यावी असे आदेश देण्यात आले आहेत. मंचाकडून अपेक्षित मदत - ज्या ग्राहकांनी सन २०१२ मध्ये चलन भरले आहे अशा ग्राहकांना वि.प.ने डांब टाकून सुरक्षित वीज जोडणी दिलेली आहे. ग्राहकाने एका निश्चित मुदतीत सुरक्षित वीज जोडणी देणेचे आदेश व्हावेत अशी विनंती केली आहे.

वितरण कंपनीने नोटीस देऊनही मुदतीत लेखी अहवाल दिला नाही.

प्रस्तुत तक्रारीची सुनावणी मंचासमोर दि. ०८.१०.२०१४ रोजी घेतली असता, ग्राहक प्रतिनिधी श्री. खापरे हजर, ग्राहक गैरहजर. श्री. खापरे यांनी ग्राहकाच्या वीज जोडणीसाठी ४ पोलचे काम आहे. ग्राहकाने ९०० फूट अंतराची केबल स्वखर्चाने टाकून विद्युत पुरवठा घेतलेला आहे. ग्राहकास दोनवेळा केबलचा खर्च करणे भाग पडले तरी सुरक्षित वीज पुरवठा मिळाला नाही, तो ठराविक मुदतीत देण्याचे आदेश वि.प. ला व्हावेत अशी विनंती केली. सुनावणीवेळी पहिल्या सत्रात वि.प.तर्फे कोणीही हजर नव्हते, दुसऱ्या सत्रात श्री. विजय माने, सहाय्यक अभियंता हजर. त्यांनी लेखी अहवाल हजर केला. ग्राहकास केबलद्वारे वीज पुरवठा मिळाला आहे. ग्राहकाच्या कनेक्शनसाठी ४ पोलची विद्युत वाहिनीची आवश्यकता असून ग्राहकाचा जेष्ठतायादीतील क्रमांक २३७ आहे. ग्राहकास जेष्ठतायादीनुसार वीज जोडणी देण्यात येईल. वि.प.ने वाहिनी उभी करणेसाठी कंत्राटदारास अद्याप आदेश दिले नाहीत. इन्फ्रा-२ च्या योजनेत असा वीज पुरवठा देण्यात येईल. वि.प.ने विद्युत पुरवठा संहिता व पुरवठ्याच्या इतर अटी विनियम २००५ मधील नियम ४.४ चा आधार घेतला आहे. ग्राहकास एका विशिष्ट योजनेमध्ये अटीनुसार केबलद्वारे विद्युत पुरवठा दिलेला आहे. वितरण कंपनी ग्राहकात भेदभाव करीत नाही. जेष्ठता यादीनुसार ग्राहकास विद्युत पुरवठा देण्यात येईल. ग्राहकाची मागणी वाहिनी उभी करुन ठराविक मुदतीत विद्युत पुरवठा करावा ही अयोग्य व अन्यायकारक आहे. त्यामुळे ग्राहकाची सदरची मागणी फेटाळण्यात यावी अशी मागणी वि.प.ने केली आहे.लेखी अहवालासोबत पैसे भरलेल्या ग्राहकांची १२ एप्रिल २०१० पासूनची यादी सादर केली आहे, त्यामध्ये ग्राहकाचा अ.क्र. २३७ आहे. मंचाने तक्रारीतील गाऱ्हाणे इतर ग्राहकांना वि.प.ने डांब टाकून सुरक्षित विद्युत पुरवठा दिला आहे याबद्दल खुलासा विचारला असतां, अशी कुठलीही वीज जोडणी देण्यात आलेली नाही. रेकॉर्ड तपासून अतिरिक्त म्हणणे मंचासमोर त्वरित सादर करतो असे सांगितले.

वरील विवेचनावरुन खालील मुद्दा निर्णयासाठी उपस्थित होत आहे.

१) ग्राहकाने मागणी केल्याप्रमाणे ठराविक मुदतीत वीज जोडणी देण्याबद्दल वि.प.ला आदेश देणे योग्य होईल काय ?

उत्तर : नाही

## कारणमिमासां

उभयबाजूंच्या कथनानुसार ग्राहकाचे मार्च २०१२ ला घरगुती वापरासाठी वीज पुरवठ्याची मागणी केली आहे, त्याचे चलन भरले आहे. केबलद्वारे ग्राहकास विद्युत पुरवठा देण्यात आलेला आहे. ग्राहकास सुरक्षित वीज पुरवठ्याचे आश्वासन देण्यता आले आहे. परंतु २ वर्षापेक्षा जास्त कालावधी उलटूनही सुरक्षित विद्युत पुरवठा दिला नाही.ग्राहक प्रतिनधींनी ग्राहकास एका ठराविक मुदतीत वीज पुरवठा मिळावा अशी मागणी केली आहे. श्री. माने, सहाय्यक अभियंता यांनी मंचासमोर ग्राहकाचे वस्तीवर घर असून अेजी फिडरवरुन घरगुती वीज पुरवठा सुरु केल्याचे सांगितले. वि.प.कडे इन्फ्रा-२ ची कामे करण्यासाठी फंडस् उपलब्ध नसलेने ग्राहकांची जेष्ठता यादी प्रलंबित आहे. मंडल कार्यालय, कोल्हापूरकडून इन्फ्राची कामे सुरु झाल्यानंतर पुरवठा संहिता कलम ४.४ नुसार ग्राहकास वीज पुरवठा देण्यात येईल असे सांगितले. नियम ४.४ मधील परंतूक याठिकाणी गैरलागू आहे. त्यातील तरतुदीनुसार केलेला वीज पुरवठा हा निश्चितपणे सुरक्षित वीज पुरवठा आहे असे म्हणता येणार नाही. ग्राहकास खर्चात टाकून अेजी फिडरवरुन वीज पुरवठा दिला आहे. ग्राहक केबलद्वारे वीज पुरवठा घेण्यास तयार झाला परंतु २ वर्षापेक्षा अधिक कालावधी होऊनही सुरक्षित वीज पुरवठा देण्यात आला नाही, त्यामुळे या ठिकाणी नियम ४.४ मधील परंतूक लागू होणार नाही. ग्राहक तक्रार निवारण मंच व विद्युत लोकपाल विनियम २००६ चे कलम ८.२ नुसार ग्राहकास ठराविक मुदतीत वीज पुरवठा देण्याचे आदेश मंच करु शकतो तसे अधिकार मंचास आहेत. परंतु या ठिकाणी मंचाचे असे मत आहे की, प्रस्तुत केसमध्ये तसे करणे योग्य होणार नाही, कारण वितरण कंपनीकडे फंडस्ची उपलब्धता नसल्याने इन्फ्राची कामे सुरु झालेली नाहीत, त्यामुळे जेष्ठतायादी प्रलंबित आहे. अेजी फिडरवरुन ग्राहकास घरगुती वापरासाठी विद्युत पुरवठा देण्यात आलेला आहे. हे निश्चित की, सदरचा वीज पुरवठा ग्राहकाच्या खर्चाने व जबाबदारीवर केबलद्वारे दिला आहे, तो सुरक्षित नाही. ग्राहक तक्रार निवारण मंच व विद्युत लोकपाल विनियम २००६ चे कलम ८.२ नुसार ग्राहकास ठराविक मुदतीत वीज पुरवठा देण्याचे आदेश करण्यासारखी परिस्थती या केसमध्ये दिसत नाही. ग्राहकास वि.प.ने इन्फ्रा-२ ची कामे सुरु झाल्यानंतर पुरवठा संहिता कलम ४.४ नुसार लवकरांत लवकर सुरक्षित विद्युत पुरवठा व तात्पुरती केबलद्वारे दिलेली वीज जोडणी बदलावी. मुद्दा क्र. १ चे उत्तर नाही असे देण्यात येऊन खालील प्रमाणे आदेश -

## आदेश

१) ग्राहकाची ठराविक मुदतीत विद्युत पुरवठा मिळणेबाबतचे वि.प.ला आदेश व्हावेत ही मागणी फेटाळण्यात येत आहे. वि.प.ने इन्फ्रा-२ ची कामे मंजूर झाल्यानंतर ग्राहकास पुरवठा संहिता व पुरवठ्याच्या अटी विनियम २००५ मधील नियम ४.४ नुसार लवकरांत लवकर विद्युत पुरवठा द्यावा.

२) या निर्णयाविरुध्द तक्रारदार यांना अपील करावयाचे असलेस त्यांना आदेशाच्या तारखेपासून ६० दिवसांचे आंत मा. विद्युत लोकपाल, केशवा. बांद्रा-कुर्ला कॉम्प्लेक्स,बांद्रा (पूर्व) मुंबई यांजकडे करता येईल.

सही/-

दिनांक : (बी.जी. पवार)

अध्यक्ष

जी. सी. लेले, सदस्य .. सही/-

जी.बी.पानकर, सदस्य सचिव .. सही/-

एकमताच्या / बहुमताच्या आदेशाची अंमलबजावणी करण्यात यावी.